Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक : रा.मं./परीक्षा-७/४९२
पुणे ४११००४
दिनांक - ३१/०१/२०२३

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** - मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला अतिरिक्त गुण प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ दि.२४/११/२०१७
२. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. डिओअे/२०२२/चार/५२४ दि.२९/१२/२०२२ रोजी चे पत्र.
३. राज्य मंडळाचे पत्र क्रमांक रा.मं./परीक्षा-७/०१९५ दि. ११/०१/२०२३

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय क्र. १ मध्ये नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात.

कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्र क्रमांक २ अन्वये चित्रकला प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे अतिरिक्त गुण प्रस्ताव सादर करण्यास दि. ३१ जानेवारी, २०२३ अशी मुदत देण्यात आलेली आहे.

तथापि काही तांत्रिक अडचणींमुळे निर्धारीत करण्यात आलेल्या वाढीव मुदतीत माध्यमिक शाळांना अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव सादर करता येणार नसल्याने तसेच कोणताही पात्र विद्यार्थी अतिरिक्त गुणांपासून वंचित राहू नये म्हणून शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव बुधवार दि. ८ फेब्रुवारी, २०२३ अखेर माध्यमिक शाळांकडून स्विकारण्यात यावेत. सदर प्रस्ताव विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक शिवाय आवेदनपत्र क्रमांकासह स्विकारण्यात यावेत. सदरची मुदतवाढ अंतिम असेल यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर मुदतवाढीबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांना अवगत करावे. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर -**

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.
२. मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. मा. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी** - व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.



क्र.नाविमं/माध्य.व-१/ 6230
नाशिक ४२२००३
दि.०२/०२/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्रानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२००३

SSC B1